प्रति,

मा. प्राचार्य,

तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान

व वाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

## विषय:- अल्पसंख्याक हक्क दिन अहवाल.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करण्यात येतो की, सोमवार दि. २० डिसेंबर, २०२१ रोजी अल्पसंख्याक हक्क दिनाच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त "आझादी का अमृत महोत्सव" या उपक्रमा अंतर्गत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने "अल्पसंख्याकांचे हक्क आणि भारतीय संविधान" या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजेंद्र कुंभार सर यांनी मार्गदर्शन केले . तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर उपस्थित होते. या व्याख्यानाचा प्रारंभ दुपारी १२:०० वा. ऑनलाईन पध्दतीने करण्यात आला.

अल्पसंख्यकांच्या हक्काविषयी संविधान सभेमध्ये भाषण करताना. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की, आपल्या देशा मध्ये सर्वांना समान अधिकार आहे. पण या देशांमध्ये लोकशाही सुद्धा आहे. लोकशाहीमध्ये बहुसंख्याकांची अल्पसंख्यांकांवर हुकूमशाही निर्माण होऊ नये. यासाठी आपण अल्पसंख्याकांच्या हक्काचे संरक्षण केले पाहिजे. त्यामुळे विषमते पासून अल्पसंख्याकांचे संरक्षण करायचे असेल, तर त्यांना सार्वजनिक, राजकीय व सामाजिक जीवनातील सहभागाची हमी दिली पाहिजे. तेव्हा बहुसंख्याकांची अल्पसंख्यांकांवर हुकूमशाही निर्माण होणार नाही. असे गौरवोद्गार ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजेंद्र कुंभार सर यांनी मांडले.

सध्या समाजातील अल्पसंख्यकांच्या बरोबर सहकार्य निर्माण करण्याची शक्यता दुरावलेली आहे. मशिदीमध्ये शस्त्रे ठेवली जातात. तेथे परधर्मियांना प्रवेश नसतो. असा गैरसमज व प्रचार जाणीवपूर्वक केला जातो. परंतु असं काही नसते, आपण अल्पसंख्याक धर्मिया बरोबर संवाद वाढविला पाहिजे. अल्पसंख्याक सुद्धा आपल्या सारखेच आहेत. आपल्या मधील सहकार्य आणि अभिसरण कमी झालेले आहे. त्यासाठी समाजाने आणि राजकीय नेतृत्वाने पुढाकार घेतला पाहिजे. देशामध्ये अलीकडच्या काळात फसीझमचे प्रस्त वाढले आहे. मॉब लिंचिंगच्या घटना घडतात. देशामध्ये अल्पसंख्यांक मुस्लिमांवर हल्ले होतात. बिहार, ओडिसा मध्ये ख्रिश्चन मिशनिरीवर हल्ले झाले. तर शिखांवर दंगलीमध्ये हल्ले झाले आहे. संविधानामध्ये अल्पसंख्याकांच्या हक्काचे संरक्षणाविषयी तरतुदी आहे. तसेच अल्पसंख्यकांना नोकरी आणि राजकारणामध्ये पुरेसे प्रतिनिधित्व दिले पाहिजे. त्याच्या हक्कांचे संरक्षण करण्याची आणि त्यांच्या वरील हल्ले रोखण्याची जबाबदारी आणि कर्तव्य अल्पसंख्याक आयोग आणि सरकारची आहे. सरकारने त्याप्रकारची इच्छाशक्ति दाखवली पाहिजे. असे आवाहन यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजेंद्र कुंभार सर यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर म्हणाले की, अल्पसंख्याकांचे गट केवळ राज्य, राष्ट्रा पुरता मर्यादित नसतो. तर त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालेले आहे. प्रत्येक राष्ट्रांमध्ये एक समुदाय असतो. त्या समुदायाच्या बरोबर काही घटक समाज उन्नतीचे कार्य करत असतात. त्यांचे समाजामध्ये अभिसरण झालेले असते. तरी हे गट स्वतःचे वेगळेपण आणि अस्मिता जपतात. त्याची नोंद महाराष्ट्राने, भारताने आणि जागतिक स्तरावर देखील घेतलेली आहे. भारतीय संविधानामध्ये अल्पसंख्यकांच्या हक्का विषयीच्या तरतुदी आहे. भारतीय संविधानाचा प्रवास हा समाजामधून झालेला आहे. त्यामुळे समाजामध्ये पडणाऱ्या पडसादाची नोंद ही संसदेमध्ये घेतली जाते. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर यांनी केले.

२१ व्या शतकात सुद्धा जैन धर्माने सांगितलेल्या पद्धतीने आणि अनेकांतवादाच्या नुसार मानवी विकासाचा प्रवास होणे अपेक्षित आहे. अनेकांतवादा विचार हा सर्वांना एकत्र सामाविष्ट करुन घेणार आहे. भारतीय संविधानामध्ये समता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांचा स्वीकार केला आहे. धर्मनिरपेक्षता याचा अर्थ प्रत्येकाला आपल्या धर्माचे आचरण संवर्धन करण्याचे स्वातंत्र्य आहे. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक समाजधुरीणांनी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. त्याला सामाजिक बांधिलकी म्हणून समाज आणि सरकारने पाठिंबा दिला. असे मत यावेळी प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर यांनी यावेळी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर सर यावेळी बोलताना म्हणाले की, २१ व्या शतकात आपण भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. आपल्या देशाचा प्रवास हा धर्मनिरपेक्ष लोकशाहीच्या माध्यमातून झालेला आहे. परंतु आज हा प्रवास अशा वळणावर आहे. ज्यामध्ये भीती वाटावी असा आहे. आज आपण स्वतःला चार-चौघांमध्ये भारतीय म्हटलं तर आपल्याला कोणी दगड तर मागणार नाही ना? अशी आजची परिस्थिती आहे. ही परिस्थिती धोक्याची घंटा आहे. सरकार तुम्हाला धर्मनिरपेक्ष म्हणण्यास मज्जाव करतय की काय? अशी भूमिका तयार झाली आहे. आम्ही भारतीय आहोत असे म्हणण्यास न्यूनगंड लपलेला आहे. अशा प्रकारची वक्तव्ये आपल्या कानावर पडतात. असे विचार आपल्या मनावर बिंबवली जात आहे. समाज आणि समाज माध्यमांमधून आता असं बोलले जात आहे. सदर ऑनलाइन व्याख्यानामध्ये ११५ विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होते.

यावेळी ऑनलाइन व्याख्यानाचे संयोजक आणि राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, उपप्राचार्य डॉ. अजित तलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा उपस्थित होते. या व्याख्यानाला मोठ्या प्रमाणात विध्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते.


या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. राजू पांडे यांनी केले. तर आभार डॉ. कैलास मांटे यांनी मांडले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा . प्राचार्य डॉ . चंद्रशेखर मुरूमकर सर , उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. अजित तेलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर , उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम , उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले

ऑनलाइन अल्पसंख्याक हक्क दिन **साजरा झाला. त्याची काही छायाचित्रे.**












Tuljaram Chaturchand College
Baramati

डॉ हनुमंत फाटक
राज्यशास्त्र विभागप्रमुख